**कायम विना अनुदान तत्वावरील प्राथमिक शाळा परवानगीचे आदेश.**

**महाराष्ट्र शासन**

क्रमांकः नप्राशा- १७०६/(११४/२००६)/प्राशि -३
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ मे, २००६.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, नागपूर, अमरावती.

**विषय : सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.**

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यांस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ३७७ (तीनशे सत्त्याहत्तर) शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास "जून २००५" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करून सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती



Principal
MTI'S,
UNIVERSAL SCHOOL
Perne, Tal.Haveli, Dist.Pune.

विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी /जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५. सदर शासनपत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००६०५१६२१०५००००१ असा आहे.

(भि.य. मंता)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

शासन पत्र क्रमांक नप्राशा-१७०६/(११४/०६)/प्राशि-३,दिनांक :१६ मे, २००६ चे सहपत्र

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित इंग्रजी माध्यमाच्या परवानगी द्यावयाच्या प्राथमिक शाळांची नांवे

## जिल्हा - पुणे

| अ.क्र | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. जोग एज्युकेशन ट्रस्ट, मयुर कॉलनी, कोथरुड, पुणे | सिंहगड रोड | इंग्रजी | १ ली |
| २ | कै.नानाभाऊ गेनभाऊ बराटे शैक्षणिक विश्वस्त व्यवस्था, गल्ली क्र.४, कॅनॉल खाली, कर्वेनगर, पुणे५२ | पुणे | इंग्रजी | १ ली |
| ३ | बुध्दीश एज्युकेशन सोसायटी, सर्व्हे क्र. ४२, श्री.संत गाडगे महाराज वसाहत, कोरेगांव पार्क, पुणे-१ | पुणे | इंग्रजी | १ ली |
| ४ | प्रज्ञानिकेतन एज्युकेशन सोसायटी, ३ रायसोनी कॉम्प्लेक्स न्यु फ्रेंडस सोसायटी,पौड रोड,कोथरुड,पुणे | म्हाळुंगे, बाणेर रोड | इंग्रजी | १ ली |
| ५ | गेनबा सोपनराव मोझे संस्था, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे | लोहगांव,पुणे | इंग्रजी | १ ली |
| ६ | कराची एज्युकेशन सोसायटी, ७७४,भवानी पेठ,पुणे | पुणे | इंग्रजी | १ ली |
| ७ | सदानंद एज्युकेशन संस्था,धानोरी,पुणे | गोकुळनगर,धानोरी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ८ | इम्तियाज अहमद चॅरिटेबल ट्रस्ट, कोंढवा,पुणे | कोंढवा | इंग्रजी | १ ली |
| ९ | आर ए शिक्षण मंडळ, चंदननगर, प्लॉट नं.३३, स्नेहांकूर चंदननगर, पुणे नगर रोड, पुणे | खराडी, चंदननगर,पुणे | इंग्रजी | १ ली |
| १० | सर सय्यद अहमद खान फौंडेशन, ८६ येरवडा,पुणे | खराडी | इंग्रजी | १ ली |
| ११ | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे व्हिजन इंग्लिश मिडीयम स्कूल संस्थेचे आवार, पुणे | कर्वेनगर,पुणे | इंग्रजी | १ ली |
| १२ | सारथी शिक्षण प्रसारक मंडळ, खराडी,पुणे | रक्षक नगर, खराडी,पुणे | इंग्रजी | १ ली |
| १३ | डी.एस.कुलकर्णी एज्युकेशन ट्रस्ट, ११८७/६०, जंगली महाराज रोड,शिवाजीनगर,पुणे | हडपसर, पुणे | इंग्रजी | १ ली |
| १४ | विठ्ठलराव तुपे विद्या प्रतिष्ठाण सन ७७, चेतन हाईटस,ससाणे नगर,हडपसर,पुणे | ससाणे नगर,हडपसर,पुणे | इंग्रजी | १ ली |
| १५ | गुरुकुल शिक्षण संस्था, विष्णुकृपा दिघीरोड,भोसरी | आळंदी देवाची | इंग्रजी | १ ली |
| १६ | आर.ए. शिक्षण मंडळ, प्लॉट नं.३३, स्नेहांकुर, चंदननगर, पुणे | कारेगांव,रांजणगांव, सांगवी एम.आय.डी.सी. शिरुर,पुणे | इंग्रजी | १ ली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | फुले एज्युकेशन सोसायटी, पुणे द्वारा सिंहगिरी जंक्शन पो. लासुर्णे ता.इंदापूर | रामटेकडी, औद्योगिक वसाहत | इंग्रजी | १ ली |
| १८ | कासेगांव एज्युकेशन सोसायटी, राजाराम इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर | लोहगांव ता. हवेली | इंग्रजी | १ ली |
| १९ | कासेगांव एज्युकेशन सोसायटी, राजाराम इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर | बावधन,ता.मुळशी | इंग्रजी | १ ली |
| २० | एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटी,एव्हरेस्ट हाऊस, २८८/३, भूगाव, पौड रोड,पुणे | भूगाव, मुळशी | इंग्रजी | १ ली |
| २१ | निनाईदेवी शिक्षण संस्था, गुरुप्रसाद अपार्टमेंट, धनकवडी पुणे | धनकवडी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| २२ | सिड संस्था, संटर फॉर एज्युकेशन ऑफ दि इकॉनॉमिकल डिसेबल, मॉडर्न इंग्लिश, मु.पो. मळवली, ता.मावळ | मळवली | इंग्रजी | १ ली |
| २३ | महात्मा ज्योतिबा फुले एज्युकेशन ट्रस्ट,राजगुरुनगर, ता.खेड | राजगुरुनगर (कातोरे वस्ती),ता.खेड | इंग्रजी | १ ली |
| २४ | महाराष्ट्र टेक्निकल इन्स्टिटयूट, दत्त प्रसाद सोसायटी, चंदननगर, खराडी | पेरणे फाटा | इंग्रजी | १ ली |
| २५ | रिझरशन शिक्षण संस्था, केसनंद, ता.हवेली | केसनंद, ता.हवेली | इंग्रजी | १ ली |
| २६ | पार्वती प्रतिष्ठाण स.नं. २८/१, भोसरी, पुणे | खंडोबामाळ, भोसरी,पुणे | इंग्रजी | १ ली |
| २७ | डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स,५१४, बुधवार पेठ, पुणे | स.न.२८, गंगानगर,निगडी | इंग्रजी | १ ली |
| २८ | कोल्हापूर नॅशनल एज्युकेशन सोसायटी ,१३५, सैनिक वसाहत, कोल्हापूर | से.न. १८, प्राधिकरण, चिंचवड | इंग्रजी | १ ली |
| २९ | प्रगती शिक्षण संस्था, बोर्डेनगर, थेरगांव,पुणे | बोर्डेनगर, थेरगांव | इंग्रजी | १ ली |
| ३० | एस.एस.पी. प्रसारक मंडळ, स.नं. १५/१, दापोडी, पुणे | स.न. १५/१, दापोडी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ३१ | बिना एज्युकेशन सोसायटी, लोकमान्य टिळक मार्ग, प्राधिकरण, निगडी | १७३/२, पांडारकर नगर, आकुर्डी,पुणे | इंग्रजी | १ ली |
| ३२ | बालभारती एज्युकेशन सोसायटी, दिघी | दिघी | इंग्रजी | १ ली |
| ३३ | समाजविकास शिक्षण मंडळ, सुरसंगम इमारत ५१/७, स्किम नंबर ११, यमुनानगर, निगडी | प्रेमलोक पार्क | इंग्रजी | १ ली |
| ३४ | सद्भावना ग्रुप फाऊंडेशन, ४१/३, केशवनगर, मुंडवा, पुणे | खराडी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ३५ | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, गट नं ६२०/२, वाघोली, हवेली, पुणे | ताथवडे | इंग्रजी | १ ली |
| ३६ | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, गट नं ६२०/२, वाघोली, हवेली, पुणे | हडपसर | इंग्रजी | १ ली |
| ३७ | जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ, गट नं ६२०/२, | वाघोली | इंग्रजी | १ ली |

Lakshmi

Principal
MTI'S,
UNIVERSAL SCHOOL
Perne, Tal.Haveli, Dist.Pune.

२७००२/०४

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(माध्यम इंग्रजी )**

जाक्र. प्राथ-२/खाप्राशा/मा.इंग्रजी /२०१५/
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. यांचे कार्यालय.
दिनांक : 28 DEC 2015

प्रति

शिक्षणाधिकारी (प्राथ),
जिल्हा परिषद, पुणे

विषय: प्रथम मान्यता मिळणेबाबत
युनिव्हर्सल स्कूल, पेरणे, ता.हवेली जि.पुणे,

संदर्भ: १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र.नप्राशा-१७०६/(११४/०६)/प्राशि-३ दि. १६.०५.२००६
२.आपले पत्र जा.क्र.जि.प. शिक्षण/प्राथ./खाप्राशा-२/२२२/२०१५ दि. ३०.०६.२०१५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला संदर्भ क्र-१ अन्वये तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व इंग्रजी माध्यमासाठी सन २००५-०६ या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. तथापि संबधीत संस्थेने सदर शैक्षणिक वर्षात शाळा सुरु न करता सदरची शाळा सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस नूतनीकरणाने परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. सदर प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस संदर्भ क्र. २ अन्वये नविन प्राथमिक शाळा सुरु करण्याच्या परवानगीचे नुतनीकरण करुन जून,२००७ पासून इ. १ ली च्या वर्गास शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर **कायम विनाअनुदान तत्वावर** परवानगी देण्यात येत आहे. इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस विनाअनुदान तत्वावर भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १. | महाराष्ट्र टेक्निकल इन्स्टिटयूट, चंदननगर, पुणे -१४ | पेरणे फाटा | १ ली | इंग्रजी | जुन २००७ |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणसंकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात

कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तीशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिका-यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्याआदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार [illegible]ीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र [illegible] चिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनाल[illegible] क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

२.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

३.अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र टेक्निकल इन्स्टिटयूट, चंदननगर, पुणे -१४

**कायम विना अनुदान तत्त्वावर**

(मराठी, **इंग्रजी,** हिंदी, उर्दू, तामिळ इत्यादी माध्यम)

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ ५३५/२०१६**
**पुणे १ दिनांक:-२५/०८/२०१६**

**प्रति,**

**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,**
**युनिव्हर्सल स्कूल, पेरणे ता. हवेली**
**जि. पुणे**

**विषय:-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/ **नैसर्गिक वाढीचा**/ जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.१४ जानेवारी २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या **नैसर्गिक वाढीचा** /जादा तुकडया /वर्ग **सन २०१५-२०१६** या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **युनिव्हर्सल स्कूल, पेरणे ता. हवेली जि. पुणे** | इंग्रजी | इयत्ता २ री ते ७ वी | नैसर्गिक वाढ | कायम विना अनुदान तत्वावर मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

**सचिव / अध्यक्ष, महाराष्ट्र टेक्निकल इन्स्टिट्यूट चंदननगर ता. हवेली जि. पुणे**

तात्काळ

## कायम विनाअनुदान (इंग्रजी माध्यम)

20245-52

जा.क्र.शिऊसं/प्राशि-३/नखाप्राशा/पुवि-०८

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 16 JUN 2008

(25)

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र टेक्निकल इन्स्टिटयूट, दत्त प्रसाद सोसायटी,
चंदननगर, खराडी

विषय :- २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत . . .

संदर्भ :- १.शासन पत्र क्रमांक नप्राशा/१७०६/ ( ११४/२००६) ) प्राशि-३, दिनांक १६.५.२००६ व दिनांक ३१.५.२००६
२. या कार्यालयाचे पत्र क्रजा.क्र.प्रा/प्राशि-३/खाप्राशा/मान्यता पुवि/०६, दिनांक ७.६.२००६ व दिनांक १४.६.२००६
३. शासन पत्र क्रमांक नप्राशा /२००६(४५७/०६)दि.१८.७.२००६
४..या कार्यालयाचे पत्र क्रमांक शिऊसं/प्राशि -०१/पुवि /२००६ दिनांक २९.७.२००६
५.शासन पत्र क्रमांक न्यायाप्र/२००८/(१९२/०८) माशि-१, दि.१७.३.२००८

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००५ - २००६ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे. असे उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक २ नुसार कळविण्यांत आले होते.

तथापी संदर्भ क्रमांक ३ नुसार शासनाने म.रा.शि.महामंडळ यांनी उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिका क्रमांक २८९७/२००६ या याचिकेवर दिलेल्या निर्णयानुसार दिनांक १६.५.२००६ ते ३१.५.२००६ या कालावधीत दिलेले नविन प्राथमिक शाळा परवानगी आदेश रदद केले होते. त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ४ अन्वये शाळा परवानगीचे आदेश रदद झाल्याचे संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांचे मार्फत आपणांस कळविण्यांत आले होते आता उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक ५ नुसार शासनाने दिनांक १६.५.२००६ ते ३१.५.२००६ या कालावधीतील परवानगी आदेश कायम राहतील असे कळविलेले आहे. त्यानुसार आपल्या शाळेस परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव [illegible] याच्या विचाराधीन आहे. आपण परवानगी मिळालेल्या ठिकाणी शाळा सुरु केली नसल्यास शासन निर्णय [illegible]ानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ अन्वये आपणांस नुतनीकरणाने परवानगी शैक्षणिक [illegible]००८-०९ पासून घेणेबाबत प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र टेक्निकल इन्स्टिटयूट, दत्त प्रसाद सोसायटी, चंदननगर, खराडी | पेरणे फाटा | पहिली | इंग्रजी |

कायम विनाअनुदान

शिक्षण प्रमुख, मनपाशिमं ,प्रशासन अधिकारी मनपा/नपाशिमं, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,यांना सदर संस्थेकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत समक्ष भेट देऊन विहित नमून्यातील स्वयंस्पष्ट शिफारशीसह आपला अहवाल १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यांत येत आहे..

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना शाळा परवानगी देणे/ न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यांत येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक / माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६. संस्थेने विहित नमून्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.

७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

१०. सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच आपला अभिप्राय सादर करावा.व त्याआधारेच शाळेची परवानगी दिली जाईल.

११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधित संस्था उघडणार नाही. असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यांत आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखिल संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१३. **शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ नुसार पुढील शैक्षणिक वर्षात (२००८-०९) शाळा सुरु न केल्यास यानंतर नुतनीकरणाच्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही. व सदर शाळांचे परवानगी आदेश रददबातल होतील याची नोंद घ्यावी.**

१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.

१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यांत यावी. (उदा:- नांव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही. सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १५ विहित अटींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसांचे आत आपल्या जिल्ह्याचे/मनपा/नपा चे शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ/ प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ यांचे कार्यालयास आवश्यक [illegible]पत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे. शाळा परवानगी दिलेल्या वर्षी शाळा सुरु केलेली नसल्यास सदर पत्र प्रा[illegible] पासून सात दिवसांचे आत शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा परिषद, शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ व या कार्यालयास लेखी कळवावे.

(ना.बा.निकम)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१. करिता.

**स्थळप्रतिवर शि. उ. स यांची सही असे**

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी

१. शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद,

३. प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/ नगरपालिका शिक्षण मंडळ,

२/-आपण सदर संस्थेच्या मूळ प्रस्तावावरुन सविस्तर पत्त्यावर वरिल शाळा परवानगी देण्याचे विचाराधीन असल्याचे आपले स्तरावरुनही तात्काळ कळविण्यांत यावे. मूळ प्रस्तावित परवानगीचे ठिकाण व माध्यम याबाबत खात्री करावी व वरिल अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा. शाळा प्रत्यक्ष सुरु नसल्यास तसे लेखी स्वरुपात या कार्यालयास सादर करावे.

प्रत : १. मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.

२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर

## कायम विना अनुदान तत्त्वावर

(मराठी, **इंग्रजी**, हिंदी, उर्दू, तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ ४३४/२०१६
पुणे १ दिनांक:-२५/०८/२०१६

**प्रति,**

**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,**
**युनिव्हर्सल स्कूल, पेरणे ता. हवेली**
**जि. पुणे**

**विषय:-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/ **नैसर्गिक वाढीचा**/ जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.१४ जानेवारी २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या **नैसर्गिक वाढीचा** /जादा तुकडया /वर्ग **सन २०१५-२०१६** या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **युनिव्हर्सल स्कूल, पेरणे ता. हवेली जि. पुणे** | इंग्रजी | इयत्ता २ री ते ७ वी | नैसर्गिक वाढ | कायम विना अनुदान तत्वावर मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

**सचिव / अध्यक्ष, महाराष्ट्र टेक्निकल इन्स्टिट्यूट चंदननगर ता. हवेली जि. पुणे**

राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना इयत्ता ५ वी इयत्ता ८ वी चा वर्ग सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशाव-२०१८/प्र.क्र.१३/एसएम-५
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
तारीख: १५ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.प्राशातु-१११२/(२५८/२०१३)/प्राशि-३, दिनांक २/७/२०१३,
२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/ ६५८९/ प्रशा-ड/५१२-अ-१/३९६५, दिनांक ७/०९/२०१७,
३. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/ १०३४०/ प्रशा-ड/५१२-अ-१/४६०२, दिनांक १०/०१०/२०१७,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. खाप्राशा-२०१७/१३४१९/ प्रशा-ड/५१२/-अ-१/ ५६९४ दि. २९/११/२०१७,
५. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.खाप्राशा-२०१७/१६५१०/ प्रशा-ड/५१२-अ-१/६२८९, दिनांक ३०/१२/२०१७,

शासन निर्णयः-

खाजगी प्राथमिक शाळांना खालील विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | शाळेचे नांव | माध्यम. | मागणी केलेला वर्ग | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | युनिव्हर्सल स्कुल, पेरणे, ता. हवेली जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| २ | एस.एस.निकम इंग्लिश मिडीयम स्कुल लोणेरे ता. माणगाव जि. रायगड | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| ३ | एस.एस. निकम इंग्लिश मिडीयम स्कुल इंदापूर ता. माणगांव जि. रायगड | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१७-१८ |
| ४ | एन.के. नारखेड इंग्लिश मिडीयम स्कुल जि. जळगांव | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ५ | फिनिक्स इंग्लिश मिडीयम स्कुल कळे ता. पन्हाळा जि. कोल्हापूर | इंग्रजी | इयत्ता ५ वी | २०१७-१८ |
| ६ | संत धुराबाई आदर्श प्रा. नूतन विद्यालय, अंबाजोगाई जि. बीड | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ७ | संत धुराबाई आदर्श प्रा.वि. परळी वै. जि. बीड | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |
| ८ | ज्ञान बोधिनी प्राथमिक विद्यालय, परळी वैजनाथ जि. बीड | मराठी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |

Maharashtra Technical Institute Reg. No. BPT/E/2138 (Pune) 13/10/1995

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | स्व. विलास बानकर इंग्लिश मिडीयम स्कुल, ब्राम्हणी ता. राहुरी जि. अहमदनगर | इंग्रजी | इयत्ता ८ वी | २०१६-१७ |

वरील शाळांना सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षापासून इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी चे वर्ग स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर जोडण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदीनूसार आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक राहील,

२. शाळेस वर्ग खोली उपलब्ध करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील,

३. सदर वर्गात विहीत निकषांप्रमाणे पटसंख्या असल्याची खात्री संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांनी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( अ.का.बोरवणकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
३. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, पुणे,औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, रायगड, पुणे, जळगाव, कोल्हापूर, बीड, अहमदनगर,
७. निवडनस्ती एसएम-५.

Maharashtra Technical Institute Reg. No. BPT/E2138 (Pune) Dt. 13/10/1995 * Pune 14. *